अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 12 फेब्रुवारी 2026 | वर्ष 11 वे | अंक 26 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# ब्रम्हपुरी-आरमोरी राष्ट्रीय महामार्गावर मृत्यूचा सापळा

## खड्ड्यांमुळे प्रवाशांचा जीव टांगणीला; अपघातांच्या संख्येत वाढ; तातडीने दुरूस्तीची मागणी

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी-आरमोरी राष्ट्रीय महामार्ग ३५३-डी वर सध्या खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून, हा प्रवास वाहनधारकांसाठी अत्यंत धोकादायक ठरत आहे. ‘सुसाट’ धावणाऱ्या वाहनांना अचानक समोर येणाऱ्या खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे. नॅशनल हायवे नागपूर विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने दुरुस्ती मोहीम राबवावी, अशी आर्त हाक प्रवासी देत आहेत.



सन २०१७ मध्ये या महामार्गाचे दुपदरी काँक्रिटीकरण पूर्ण झाले होते. मुंबईच्या अजवाणी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने हे काम केले असून, पाच वर्षांचा देखभाल कालावधीही यशस्वीपणे पूर्ण केला. मात्र, रस्ता तयार होऊन आता ८ ते ९ वर्षे उलटल्याने सिमेंट काँक्रीटच्या या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत.

काँक्रीट रोडवर पडलेले खड्डे वेगात ये-जा करणाऱ्या वाहनचालकांच्या सहजासहजी लक्षात येत नाहीत. रात्रीच्या वेळी दुचाकीस्वारांना खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने वाहने घसरून गंभीर दुखापती होण्याचे प्रमाण वाढले आहे. खड्डा वाचवण्याच्या नादात समोरून येणाऱ्या वाहनाला धडक बसण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

देखभालीची मुदत संपल्यानंतर या मार्गाच्या डागडुजीकडे संबंधित विभागाने पाठ फिरवल्याचे चित्र आहे. नवीन येणाऱ्या प्रवाशांना या मार्गावरील खड्ड्यांची माहिती नसल्याने त्यांचे वाहन पलटी होऊन मोठे अपघात घडत आहेत. 'आम्ही जीव मुठीत धरून प्रवास करत आहोत, प्रशासनाला मोठा अपघात होण्याची प्रतीक्षा आहे का?' असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

भविष्यातील संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी नॅशनल हायवे नागपूर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने या खड्ड्यांची दुरुस्ती करावी आणि प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची हमी द्यावी, हीच प्रमुख मागणी आता जोर धरत आहे.

वाचाल तर वाचाल..

# ब्रम्हपुरीत ‘क्रीडा महोत्सव २०२६’ चा बिगुल वाजणार

## क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण

ब्रम्हपुरी / प्रतिनिधी

स्थानिक खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी ब्रम्हपुरी स्पोर्ट्स असोसिएशन (BSA) सज्ज झाली असून, येत्या १३ व १४ फेब्रुवारी २०२६ रोजी ब्रम्हपुरीत भव्य क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाच्या विस्तीर्ण क्रीडांगणावर हा क्रीडा सोहळा रंगणार आहे.



या महोत्सवाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यात ६ वर्षांच्या बालकांपासून ते ४० वर्षांवरील ज्येष्ठ खेळाडूंपर्यंत सर्वांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले आहेत. अॅथलेटिक्सच्या विविध प्रकारांमुळे ब्रम्हपुरीच्या क्रीडा विश्वात सध्या उत्साहाचे वातावरण आहे. स्पर्धेतील मुख्य आकर्षणे म्हणजे धावणे ३० मीटर ते ८०० मीटरपर्यंतच्या विविध शर्यती. मैदानी खोळ लांबउडी, गोळाफेक आणि थाळी फेक.रिले शर्यत ४×५० मी, ४×१०० मी आणि विशेष 'मिक्स रिले'चा थरार. विशेष गट ६, ८, १०, १२, १४, १६, १८ वयोगटांसह ४० वर्षांवरील महिला-पुरुषांसाठी स्वतंत्र स्पर्धा.

खेळाडूंच्या कौशल्याचा गौरव करण्यासाठी आयोजकांनी प्रथम क्रमांक - १,००० रुपये, द्वितीय क्रमांक - ७०० रुपये, तृतीय क्रमांक - ५०० रुपये, व प्रत्येक सहभागी खेळाडूला सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. बाहेरगावावरून येणाऱ्या खेळाडूंसाठी आयोजकांमार्फत राहण्याची व जेवणाची उत्तम सोय करण्यात आली आहे. आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांच्या आशीर्वादाने आयोजित या महोत्सवासाठी नोंदणी करण्याची अंतिम तारीख ११ फेब्रुवारी २०२६ आहे. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी 8657770845, 8605479916, 8080680927, व 9049628376 या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. नुकत्याच झालेल्या पत्रकार परिषदेला ब्रम्हपुरी स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. देविदास जगनाडे सर, उपाध्यक्ष भाऊराव राऊत सर, सचिव राहुल जुआरे, कोषाध्यक्ष रोहित बरडे, सदस्य विशाल कानतोडे, कविता घोरमोडे आणि मुनिराज कुथे सर उपस्थित होते. खेळाडूंनी या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन असोसिएशनतर्फे करण्यात आले आहे.




# स्व. अशोकजी सिंहल स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन

ब्रम्हपुरी/का.प्र.

दरवर्षी प्रमाणे एकात्मता शिक्षण संस्था द्वारे स्व. अशोकजी सिंहल स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन हिंदू ज्ञान मंदीर ब्रम्हपुरीचे प्रांगणात दि ११ फेब्रुवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ ला आयोजन करण्यात आले आहे. २०२६ हे सलग १० वे वर्षे असुन

(उर्वरित पान क्र. ६ वर)

संपादकीय...

## अफवांचे दाट धुके!

राजकारणात अफवा, संशय आणि अपूर्ण माहिती यांचे मिश्रण झाले की निर्माण होणारे धुके अनेकदा वास्तवापेक्षा दाट असते. अलीकडील घडामोडींनंतर राज्यातील राजकीय वातावरणात नेमके हेच चित्र दिसत आहे. एवाद्या दुर्दैवी घटनेनंतर किंवा मोठ्या नेत्याभोवती अचानक निर्माण झालेल्या अनिश्चिततेनंतर सार्वजनिक चर्चेचा सूर लगेच भावनिक, संशयप्रधान आणि तर्ककुशलतेपेक्षा अनुमानांवर आधारित होतो. सोशल मीडियाच्या झपाट्याने वाढलेल्या प्रभावामुळे ही प्रवृत्ती अधिक तीव्र झाली आहे. परिणामी सत्य बाहेर येण्यापूर्वीच असंख्य ‘थियरीज’ जन्म घेतात आणि त्या इतक्या वेगाने पसरतात की अधिकृत खुलासे येईपर्यंत लोकमताचे रूपांतर गोंधळात झालेले असते.

अशा परिस्थितीत सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. कोणत्याही अपघाताची किंवा संवेदनशील घटनेची चौकशी ही वेळखाऊ असली तरी प्राथमिक तथ्ये तातडीने जनतेसमोर ठेवणे आवश्यक असते. कारण माहितीचा अभाव हा संशयाला पोषक ठरतो. अधिकृत यंत्रणा शांत राहिली किंवा उशिरा बोलली तर अपुऱ्या माहितीतून अफवांचे जाळे विणले जाते. त्यामुळे चौकशी पूर्ण होईपर्यंत किमान पारदर्शक संवाद ठेवणे ही प्रशासनाची जबाबदारी ठरते. अन्यथा जनतेच्या मनात निर्माण होणारा अविश्वास हा केवळ एका घटनेपुरता मर्यादित राहत नाही; तो संपूर्ण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे करतो.

दुसरीकडे राजकीय पक्षांच्या अंतर्गत चर्चांनाही अशीच पारदर्शकता अपेक्षित असते. एखाद्या पक्षाच्या विलीनीकरणाबाबत किंवा संघटनात्मक बदलांबाबत सातत्याने उलटसुलट बातम्या येत राहिल्या, तर कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण होणे स्वाभाविक आहे. पक्षनेतृत्वाने वेळोवेळी स्पष्ट भूमिका मांडली नाही, तर विरोधकांकडून किंवा सोशल मीडियातून पसरविल्या जाणाऱ्या चर्चांना खतपाणी मिळते. राजकारणात रणनीती म्हणून मौन राखणे कधी उपयुक्त असले, तरी दीर्घकाळ तेच धोरण टिकविल्यास पक्षांतर्गत अस्वस्थता वाढते आणि जनतेत संशयाचे वातावरण घट्ट होते.

आजच्या डिजिटल युगात प्रत्येक व्यक्ती स्वत:ला विश्लेषक समजून मते मांडते. माहितीचे लोकशाहीकरण ही जरी सकारात्मक बाब असली, तरी अप्रमाणित माहितीच्या प्रसाराने निर्माण होणारा गोंधळ हा लोकशाहीसाठी धोकादायक ठरू शकतो. विशेषत: संवेदनशील घटनांमध्ये भावनिक प्रतिक्रिया आणि राजकीय हेतू यांचे मिश्रण झाले की सत्य अधिकच धूसर होते. म्हणूनच जबाबदार संवाद ही केवळ सरकारचीच नव्हे, तर राजकीय पक्षांची आणि माध्यमांचीही संयुक्त जबाबदारी आहे.

राजकीय वास्तव हे अनेक स्तरांवर बदलत असते. सत्तासमीकरणे, आघाड्या, विलीनीकरणाच्या चर्चा किंवा नेतृत्वबदल या सर्व बाबींचा परिणाम थेट जनतेच्या मनोभूमिकेवर होतो. त्यामुळे कोणतीही अनिश्चितता दीर्घकाळ ठेवणे हे कोणत्याही पक्षाच्या हिताचे नसते. स्पष्ट भूमिका, वेळेवर खुलासे आणि सातत्यपूर्ण संवाद या तीन गोष्टी राजकीय स्थैर्यासाठी अत्यावश्यक आहेत.

एकूणच, संशय आणि संभ्रम हे माहितीअभावी वाढतात आणि पारदर्शकतेनेच कमी होतात. सरकारने चौकशीची प्रक्रिया विश्वासार्ह ठेवत जनतेला वेळोवेळी माहिती द्यावी, तर राजकीय पक्षांनी अंतर्गत निर्णयांबाबत स्पष्टता ठेवावी. अन्यथा अफवांचे धुके अधिकच दाट होत जाईल आणि वास्तवाचा मार्ग अधिकच कठीण बनेल. लोकशाहीची खरी ताकद ही केवळ निवडणुकांत नसून विश्वासार्ह संवादात असते, तीच आजच्या काळाची खरी गरज आहे.

**अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार वाचा या लिंक वर...**
**www.bramhapurisamachar.com/bs**

## मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर

### लॉयन्स क्लब ब्रम्हपुरी व ब्रम्हपुरी ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्थेचा उपक्रम

ब्रम्हपुरी/का.प्र.

सामाजिक बांधिलकी जपत लायन्स क्लब ब्रम्हपुरी आणि ब्रम्हपुरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच भव्य विनामूल्य डोळे तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर उत्साहात पार पडले. गेल्या २५ वर्षांची सातत्यपूर्ण परंपरा कायम राखत, यावर्षीही ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी देलनवाडी वार्ड येथील मदर्स पेट स्कूलमध्ये या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यात एकूण २०० रुग्णांची तपासणी करण्यात आली. यातील ४० रुग्णांची शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली. सदर रुग्णावर कस्तुरबा आय हॉस्पिटल, सेवाग्राम येथे शस्त्रक्रिया करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कस्तुरबा हॉस्पिटलचे डिन डॉ. अजय शुक्ला व त्यांच्या चमूचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर पतसंस्थेचे अध्यक्ष अनिल दोनाडकर, उपाध्यक्ष अरविंद आंबोरकर, कार्यकारी अधिकारी संजय मेश्राम, लायन्स क्लबचे प्रा. उमेश मिश्रा, मेजर विनोद नरड, प्रोजेक्ट डायरेक्टर वसंत कावळे, क्लब अध्यक्ष गणेश समृतवार, सचिव किरण झाडे आणि मदर्स पेट स्कूलच्या संचालिका रश्मी पेशने उपस्थित होते. या शिबिरासाठी ब्रम्हपुरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेकडून मोलाचे आर्थिक सहकार्य लाभले. पतसंस्थेचे लेखापाल युवराज सोंदरकर यांनी संस्थेच्या विविध बचत योजनांची माहिती दिली, तर अध्यक्ष अनिल दोनाडकर यांनी आपल्या संबोधनातून सामाजिक कार्याचा वारसा असाच पुढे नेण्याचा मानस व्यक्त केला.




कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन लायन अरविंद खोकले यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. विजय खंडाते यांनी मानले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी शेखर बन्नोरे, शंकरराव केळझरकर, अखिलेश नागपूरकर, रामकुमार झाडे, तानाजी मोहोरकर यांच्यासह लायन्स क्लबच्या अलका खोकले, अमिता बन्नोरे, साधना केळझरकर, अर्चना खंडाते, हेमलता नागपूरकर, कैलाश पेशने, आणि पतसंस्थेच्या कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले. शिबिराकरिता पत संस्थेकडून आर्थिक सहकार्य लाभले.

## शेतातील मोटारपंप चोरी करणाऱ्यांना आरोपींना अटक



ब्रम्हपुरी/का.प्र.

सोनेगाव येथील सोमेश्वर श्रीराम दर्वे यांच्या तक्रारीनुसार शेतात पाणी करण्यासाठी नदीमध्ये लावलेले मोटार पंप कोणीतरी अज्ञात इसमाने नट बोल्ड काढून चोरून नेले. त्यावरून अप क्रमांक ११६/२०२६ कलम ३०३ (२) भा.त्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाच्या तपासात सोनेगाव शेतशिवारात दोन व्यक्ती मोटारपंप मधील तांबा काढून व मोटारपंप शेतात लपवून ठेवल्याची मिळाली. गोपनिय माहितीच्या आधारे पोलीसांनी आरोपी अनिल रामाजी मैंद व राजू साहदेव चावने दोन्ही रा. सोनेगाव यांना ताब्यात घेत विचारपुस केली असता त्यांनी गुन्ह्याची कबूली दिली. सोनेगाव येथील नदीघाटवरील ३ एच.पी. ची मोटार पंप चोरुन नेल्याचे सांगीतले. तसेच अधिक चौकशीअंती सोनेगाव येथील नदीघाटावरील इतर दोन मोटार पंप तसेच बोटाळा येथील नदीनाल्यामधील एक मोटार पंप चोरी केल्याचे सांगीतल्याने सदर आरोपीकडून एकून ०४ मोटारपंप हस्तगत करण्यात पोलीसांना यश आले.

ही कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, मा. अप्पर पोलीस अधिक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी ब्रम्हपुरी दारासिंग राजपूत, पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांचे मार्गर्शनाखाली ब्रम्हपुरी पोलीस ठाणे येथील गुन्हे शोध पथक चे सहा. पोलीस निरीक्षक मनोज खडसे यांचे नेतृत्वामध्ये पोलीस हवालदार मुकेश गजबे, पोलीस अंमलदार वशिष्ट रंगारी, प्रविन भिवगडे, निलेश तुमसरे, इर्शाद खान व स्वप्नील पळसपगार यांनी केली.

### विनोदिनी

एका गावात एका तलाठ्याच्या मागे एक कुत्रा लागतो...
त्या तलाठ्याला तो कुत्रा गावभर पळवतो... शेवटी तलाठी एका ऊंच झाडावर चढून बसतो....
आणि झाडावरूनच कुत्र्यावर रागावून म्हणतो...
तुला माहीत नाही की तु कोणाशी पंगा घेतला आहे, तुझी एक गुंठा जरी जमीन असती ना, तर तुला कळले असते मी काय चीज आहे...
‘‘तलाठी’’ आहे मी ‘‘तलाठी’’
तुझ्या सात पिढ्यांना अद्दल घडवण्याची ताकत आहे माझ्यात...!!!

# ब्रम्हपुरी तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना मोफत ५ ब्रास रेती वाटप सुरू

## पात्र लाभार्थ्यांनी मोफत रेतीचा लाभ घेण्याचे तहसीलदार सतीश मासाळ यांचे आवाहन

ब्रह्मपुरी/का.प्र.

पक्के घर बांधण्याचे स्वप्न पाहणाऱ्या ब्रह्मपुरी तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. महाराष्ट्र शासनाच्या नवीन वाळू धोरणानुसार, तालुक्यातील २८८५ लाभार्थ्यांना ५ ब्रासपर्यंत मोफत रेती देण्याची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू करण्यात आली असून, आतापर्यंत हजारो ब्रास रेतीचे यशस्वी वाटप करण्यात आले आहे.

शासनाच्या धोरणानुसार, ब्रह्मपुरी तालुक्यातील तपाळ आणि बरडकिन्ही हे दोन रेती घाट विशेषतः घरकुल लाभार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. पंचायत समितीकडील २७३१ आणि नगर परिषदेकडील १५४ अशा एकूण २८८५ लाभार्थ्यांची यादी प्रशासनास प्राप्त झाली. ग्रामीण भागातील ४२६ लाभार्थ्यांना घरपोच वाहतूक परवाना (पास) देऊन ९९४ ब्रास रेतीचे वाटप पूर्ण झाले आहे. तालुक्यातील लिलाव झालेल्या १३ रेतीघाटांमधून (अहेरनवरगाव, पिंपळगाव, कोलारी, बोढेगाव, हळदा यांसह अन्य घाटांचा समावेश आहे) एकूण उत्खननाच्या १०% रेती घरकुल लाभार्थ्यांसाठी राखून ठेवण्यात आली आहे. एकूण राखीव साठा १३,९२० ब्रास असून आतापर्यंत ५२८ लाभार्थ्यांना १२८० ब्रास रेती देण्यात आली आहे. केवळ घाटच नव्हे, तर महसूल पथकाने जप्त केलेली अवैध रेती देखील घरकुल बांधकामासाठी वळवण्यात आली आहे. जप्त केलेल्या १०३४ ब्रास साठ्यातून ५१७ लाभार्थ्यांना मोफत रेतीचा लाभ देण्यात आला आहे.

सध्या प्रशासनाकडे १२,६४० ब्रास रेतीसाठा शिल्लक असून, उर्वरित सर्व लाभार्थ्यांना मोफत रेती देण्याची कार्यवाही वेगाने सुरू आहे. येत्या महिन्याभराच्या आत सर्व पात्र लाभार्थ्यांना रेतीचे वाटप पूर्ण केले जाईल, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये क्रिडा स्पर्धा संपन्न




ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एल. एम. बी. पब्लिक स्कूलमध्ये २०२५-२६ च्या शैक्षणिक सत्रामधील क्रिडा स्पर्धा पार पडल्या.

मानवी आयुष्यामध्ये खेळाला अनन्य साधारण असे महत्व आहे. खेळामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. धावपळीचा जगात विद्यार्थी केवळ अभ्यासातच नव्हे तर सर्वच बाबींमध्ये अव्वल असावे. या उद्दात हेतूने शाळेद्वारे क्रिडा स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये Running, Turtle Walk, Book Balancing, Ring Throw, Crowling, Hurdle या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धा यशस्वीरित्या संपन्न करण्यासाठी शाळेचे क्रिडा शिक्षक यांनी अथक परिश्रम घेतले. या स्पर्धेमध्ये नर्सरी ते के. जी. २ च्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

विद्यार्थ्यांना शारिरीक व मानासिक दृष्ट्या सक्षम बनाविण्यासाठी शाळेचो मुख्याध्यापक कादिर कुरेशी, क्रिडा शिक्षक यांनी विद्यार्थ्यांना खेळांविषयी माहिती व सूचना दिल्या. सफलतेकरिता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य केले.

# महाराष्ट्र इन्स्टिटयुट ऑफ पॉलिटेक्निक येथे आंतर महाविद्यालयीन खो-खो स्पर्धा संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटेक्निक, ब्रम्हपुरी येथे आंतर पदविका अभियांत्रिकी



विद्यार्थी क्रीडा संघटना (IEDSSA) अंतर्गत 'I-ZONE' मुला-मुलींची आंतर महाविद्यालयीन खो-खो स्पर्धा दि. ५ ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत उत्साहात संपन्न झाली. स्पर्धेत विविध महाविद्यालयांतील खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

या स्पर्धेत मुलांच्या गटातून १३ महाविद्यालयांचे संघ तर मुलींच्या गटातून ९ महाविद्यालयांचे संघ सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्घाटन शासकीय तंत्रनिकेतन, ब्रम्हपुरीचे प्राचार्य डॉ. राजन वानखडे यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्राचार्य सुयोगकुमार बाळबुधे होते. विशेष अतिथी म्हणून महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, बेटाळा येथील प्राचार्य प्रा. विशाल लोखंडे उपस्थित होते.

मुलांच्या गटात शासकीय तंत्रनिकेतन, ब्रम्हपुरी संघ विजेता ठरला तर शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया संघ उपविजेता ठरला. मुलींच्या गटात शासकीय तंत्रनिकेतन, ब्रम्हपुरी संघ विजेता तर महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटेक्निक, बेटाळा संघ उपविजेता ठरला. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य श्री. सुयोगकुमार बाळबुधे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा समितीचे सदस्य प्रा. राहुल उके, प्रा. अशद शेख, प्रा. अजित बुराडे, प्रा. नैना मेश्राम, प्रा. शुभांगी पेंदाम तसेच विभागप्रमुख प्रा. नरेंद्र समर्थ, प्रा. गिरीश साखरे यांच्यासह प्राध्यापक हितेश सहारे, यादव कोसे, सचिन भर्रे, भाग्यश्री सहारे, प्रणव सूर्यवंशी, रजत बागडे, प्रफुल बावनकर,प्रशांत शेंडे, विकास झोडे व कर्मचारी वर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले. पंच म्हणून भाऊरावजी कावळे, विलासजी सांगोळकर, गोविंदजी करंबे, सी. पी. जेम्स, प्रदीपजी भैसारे, गौरव करंबे व स्वयंसेवक विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

विजयी व उपविजयी संघांचा मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. समारोपीय कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र पिसे उपस्थित होते.

# महिलांची उन्नती झाली तरच समाज व देशाची उन्नती

## प्रा. सुपले व्याख्यानमालेत डॉ. धनराज खानोरकरांचे प्रतिपादन

नागभीड/प्रतिनिधी

सीता, द्रोपदीपासून पुरुषी अधिपत्याखाली महिलांवर अन्याय केल्या गेला. पुरुषप्रधान संस्कृतीनं त्यांना दुय्यम लेखलं. प्रगत देशात स्त्री - पुरुष भेद केल्या जात नाही, त्या देशाची प्रगती झाली. आपल्याकडे




समाजसुधारक राजा राम मोहन रॉय, म.फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे, आगरकर, डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी महिलोन्नतीसाठी महत्वाचे कार्य केले. यामुळे महिला मुख्य प्रवाहात आल्या. तरीपण या असे झाले, म्हणजे संपूर्ण महिलोन्नती साधली गेली तर समाज व देशाची उन्नती होईल.' असे काव्यमय मार्मिक विवेचन प्रसिद्ध कवी, लेखक डॉ धनराज खानोरकरांनी केले. ते नागभीड येथील गो.वा. महाविद्यालयात स्व.प्रा.प्र.कृ. सुपले व्याख्यानमालेत 'महिला सबलीकरणातून समाजनिर्मिती 'विषयावर प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

या व्याख्येनमालेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्रा.मिलिंद सुपले होते तर प्राचार्य डॉ.संजय सिंग, डॉ. ज्योती दुपारे विचारपीठावर उपस्थित होत्या. यानंतर डॉ. ज्योती दुपारेंनी 'मी जिजाऊ बोलते' हा एकपात्री प्रयोग सादर केला. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ पार पडला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. संजय सिंग यांनी केले तर संचालन डॉ.रवी रणदिवे, डॉ. दीपक मोरांडे व आभार संयोजक डॉ.निकिता मिश्रानी मानले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एन.एस.कोकोडे, डॉ.माधुरी कोकोडे, डॉ.राजन जयस्वाल, प्राचार्य वसंत पाटणकर, सौ.पाटणकर, रिध्देश्वर वारजूरकर, श्रीमती महाजन, सौ.कल्याणी सुपले, समस्त प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# सुतार समाजाचा स्नेहमिलन सोहळा व उपवर वधु-वर परिचय मेळावा संपन्न

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी येथील कुर्झा रोडवरील राजीव गांधी सभागृहात रविवार दिनांक ८ फेब्रुवारी रोजी श्री प्रभू विश्वकर्मा तसेच गजानन महाराज प्रकट दिनाचे औचित्य साधून ब्रह्मपुरी येथील अखिल सुतार समाज मंडळाच्या वतीने समाज बांधवांसाठी उपवर वधू परिचय मेळावा व मनोमिलन सोहळा, तसेच ज्येष्ठ नागरिक गुणवंत विद्यार्थी विद्यार्थिनीचा सत्कार. ज्येष्ठांचे मार्गदर्शन व विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.




दीप प्रज्वलन आणि श्री प्रभू विश्वकर्मा यांची महाआरती करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ब्रह्मपुरी अखिल सुतार समाज मंडळाचे अध्यक्ष विजय शास्त्रकार यांनी भूषवले, कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून ब्रह्मपुरी नगरपरिषदेचे नगरसेवक अनुकूल शेंडे, तर सह उद्घाटक म्हणून डॉ सागर माकडे ब्रह्मपुरी मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सुधाकर झिलपे, हरिदास पोटेकर, कवडूभाऊ पिंपळकर यांच्यासह अन्य मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. मनोमिलन सोहळ्याच्या निमित्त मान्यवरांनी आप-आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरज शास्त्रकार यांनी केले. कार्यक्रमाला बहुसंख्येने सुतार समाज बांधव उपस्थित होते.

# पात्र ज्येष्ठ नागरिक, विधवा व दिव्यांगांना तात्काळ अनुदान द्या

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी तालुक्यातील १०७ पात्र ज्येष्ठ नागरिक, विधवा



महिला व दिव्यांग व्यक्तींना केंद्र सरकारच्या विशेष निधीमधून दरमहा १५०० रुपये निवृत्ती वेतन देण्यात येते. यापैकी काही लाभार्थी ज्येष्ठ नागरिक ,विधवा महिला व दिव्यांग व्यक्ती असल्यामुळे ते कुटुंबाच्या आधाराने राहत असतात आणि त्यांना वेळोवेळी औषधोपचार करावा लागतो. आधीच कुटुंबावर भार असल्याची भावना कुटुंबप्रमुखावर असल्याची त्यांना खंत वाटते आणि तेव्हा त्यांना औषधोपचारासाठी कुणाकडून पैसे घ्यावे हा मोठा प्रश्न निर्माण होतो.

ब्रह्मपुरी तालुक्यातील १०७ सदर लाभार्थी सहा महिन्यापासून अनुदानापासून वंचित असून यासाठी प्रशासनाने तात्काळ निधी उपलब्ध करून व संक्शन प्रक्रिया पूर्ण करून डीबीटी मार्फत अनुदान वितरित करण्यात यावे यासाठी प्रशासनाने अलर्ट मोडवर येऊन कार्य करावे. गेल्या सहा महिन्यापासून या लाभार्थ्यांची दैनावस्था झाली आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय आपण लवकरात लवकर केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून हा विषय मार्गी लावावा म्हणून तहसीलदार ब्रह्मपुरी यांचे मार्फत मुख्यमंत्र्यांना लाभार्थ्यांच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले.

याप्रसंगी भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव प्रा प्रकाश बगमारे, चंद्रपूर जिल्हा भाजपा ओबीसी मोर्चा माजी महामंत्री नगरसेवक मनोज भूपाल, ब्रह्मपुरी तालुका भाजपा ओबीसी मोर्चा अध्यक्ष प्रेमलाल धोटे, माजी अध्यक्ष प्रा अशोक सालोडकर, ओबीसी मोर्चा शहर उपाध्यक्ष घनश्यामजी कावडे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते लोकमान अलोने, श्रीधर ठाकरे, साहिल चिंचुलकर, युवराज तलमले, जयघोष सहारे, मिलिंद राऊत, प्रा सुभाषचंद्र खोब्रागडे, संजय नागोसे व अन्य उपस्थित होते.

# ॲड. भेंडारकर स्मृतीप्रित्यर्थ कार्यक्रम

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्व.ॲड. गोविंद भेंडारकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ 'स्मृतीगंध' या श्रध्दांजलीपर कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६ ला दुपारी १२ वाजता नागभीड येथील रूक्मिणी मंगल कार्यालय येथे करण्यात आले आहे.



आमदार विजय वडेट्टीवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या समारोहाला माजी गृहमंत्री अनिल देशमुख, आमदार सुधाकर अडबले, माजी आमदार वामनराव चटप, माजी आमदार सुभाष धोटे, जनमंचचे राजीव जगताप, माजी आमदार देवराव भांडेकर, सुप्रसिध्द उद्योगपती श्रावण ब्राम्हणकर, डॉ. राजाभाऊ ताकसांडे, राजेंद्र वैद्य, ऋषीजी राऊत, डॉ. एन.एस. कोकोडे, ब्रम्हपुरीचे नगराध्यक्ष योगेश मिसार, नागभीडच्या नगराध्यक्ष स्मिता खापर्डे आदी गणमान्य व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मालडोंगरी-धामणगांव मार्गाच्या दुरूस्ती कामाचे भूमीपूजन

## आम. वडेट्टीवार यांच्या प्रयत्नातून ३७ लाखांचा निधी मंजूर



ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील मालडोंगरी ते धामणगाव या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या दुरुस्तीच्या कामासाठी ३७ लाख रुपयांचा निधी विधीमंडळ कॉंग्रेस पक्षनेते, आमदार विजय वडेट्टीवार यांच्या विशेष प्रयत्नांतुन मंजूर झाला आहे. सदर कामाचे भूमिपूजन दि. १० फेब्रुवारी रोजी तालुका कॉंग्रेस कमिटीचे व ग्राम कॉंग्रेस पदाधिकारी व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संपन्न झाले आहे.

मालडोंगरी ते धामणगाव या डांबर रस्त्यावर खड्डे पडले होते. त्यामुळे या रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. या संदर्भात धामणगाव परिसरातील नागरिकांनी सदर रस्ता दुरुस्त करण्यात यावे अशी मागणी तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके यांच्या कडे केली होती. सदर मागणीबाबत तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके यांनी विधीमंडळ कॉंग्रेस पक्षनेते, आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांना माहिती अवगत केली. सदर मागणीची तात्काळ दखल घेत विधीमंडळ कॉंग्रेस पक्षनेते, आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांनी विशेष प्रयत्न करून वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ३७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

भुमीपुजन कार्यक्रम प्रसंगी तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रा.राजेश कांबळे, नगरसेवक पुष्पाकर बांगरे, जिल्हा कॉंग्रेस सहसचिव गाजी पटेल, जगदीश आमले, सुनील विखार, सोमेश्वर उपासे, राम मोहन ब्राडिया, सुधीर पंदीलवार, कॉंग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# घरातून दागिने चोरणाऱ्या महिलांना अटक

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील मुई गावात सर्कशीचा खेळ सुरू होता. खेळ संपल्यानंतर सर्कशीचा खेळ दाखविणाऱ्या महिला घरोघरी फिरून तांदूळ व खाण्याच्या वस्तु मागत होत्या. यादरम्यान त्यांनी एका महिलेच्या घरातून कूकरमध्ये ठेवलेले लाखोंचे सोने लंपास केले. या प्रकरणी ब्रह्मपुरी पोलिसांनी दोन आरोपी महिलांना अटक केली असून, चोरी केलेले सोनेसुद्धा जप्त करण्यात आले आहे.

घरातील कुकरमध्ये ठेवलेला १० ग्रॅम वजनाचा सोन्याचा गोप, २ नग कानातील दागिन्यास रोख रक्कम अज्ञात चोरांनी चोरून नेल्याची तक्रार मुई येथील शीला मानकर यांनी ५ फेब्रुवारी रोजी ब्रह्मपुरी पोलिसात दाखल केली होती. पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तपासादरम्यान काही बाहेर गावातील महिला ४ फेब्रुवारी रोजी मुई गावात सर्कशीचा खेळ दाखविण्यासाठी आल्या होत्या. खेळ संपल्यानंतर त्या घरोघरी तांदूळ व खाण्याच्या वस्तू मागत फिरत होत्या, अशी माहिती पोलिसांनी मिळाली. यावरून शीला मानकर यांच्या घरी झालेल्या चोरीत त्या महिलांचाच सहभाग असावा, असा संशय पोलिसांना आला.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी नागभीड ते ब्रह्मपुरी मार्गावरील खुल्या जागेवर डेरा टाकून बसलेल्या दोन महिलांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्यांनी मानकर यांच्या घरी चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपी महिला असासेवर चंदा सिकंदर सय्यद, मदिना अल्ताफ शेख (रा. दोघीही दरेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक) यांना अटक करून त्यांच्याजवळून सोन्याचे दागिने रोख रक्कम असा एकूण २ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**जल है तो कल है...**

# जेष्ट नागरिक संघटनेतर्फे न.प. पदाधिकाऱ्यांचा सत्कार

ब्रम्हपुरी/का.प्र.

जेष्ट नागरीक संघटना ब्रम्हपुरी च्या ३१ जानेवारी २०२६ च्या वार्षिक सभेत नगर परिषद



ब्रम्हपुरीचे अध्यक्ष योगेश मिसार, उपाध्यक्ष डॉ. नितीन उराडे, विविध समित्यांचे सभापती सतीश हुमने, मनोज कावळे, सचीन राऊत व बबीताताई आमले व स्वीकृत सदस्य पुष्पांकर बांगरे यांचा सत्कार व स्वागत आयोजीत करण्यात आला होता.

या प्रसंगी जेष्ट नागरिकांच्या विविध समस्या व प्रश्न सभेसमोर मांडण्यात आले. सर्व पदाधिकाऱ्यांनी अत्यंत आत्मीयतने आपले विचार मांडले व संपूर्ण सहकार्य देण्यात येईल असे आश्वासन दिले.

सभेच्या अध्यक्षस्थानी प्रा. सुभाष बजाज तसेच मंचावर कार्याध्यक्ष हरिश्चंद्र चोले, सचीव राजेंद्र हेमणे, कोषाध्यक्ष आसारामजी बोदेले, सहसचीव फाल्गुनजी राऊत व इतर मान्यवर विराजमान होते. परिपाठीनुसार सभेत तीन जेष्ट सदस्यांचा सत्कार करण्यात आला व ७५ वर्षापेक्षा जास्त असलेल्या सदस्यांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. सहभोजनानंतर सहसचीव फाल्गून राऊत यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

# महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे यश

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाळा येथील बी.फार्म अंत्य सातव्या सत्रातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादित केले. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली द्वारा नुकत्याच घेण्यात आलेल्या हिवाळी २०२५च्या परीक्षेत सातव्या सत्रातील ,बी.फार्म अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून महाविद्यालयाचे यशस्वी परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला.





या निकालात प्रशांत रवींद्र शिवणकर याने ८.६७ एसजीपीए प्राप्त करून प्रथम स्थान पटकाविले तसेच पियुष विलास शेंडे याने ८.५८ एसजीपीए प्राप्त करून द्वितीय स्थान पटकाविले, तर कु. तन्वी सुरेश मनदाडे हिने ८.५० एसजीपीए प्राप्त करून तृतीय स्थान पटकाविले. अंतिम वर्षाची निकालाची टक्केवारी ९८.५३ टक्के आहे. तसेच ५३ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता श्रेणीत स्थान प्राप्त केले आहे. महाविद्यालयातील अनुभवी आणि कुशल प्राध्यापक वर्ग यांचे योग्य मार्गदर्शन तसेच संस्थेने वेळोवेळी पुरविलेल्या सुविधा व सोई यामुळेच महाविद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली. विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र पिसे व प्राचार्य डॉ.दुधे यांनी सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र विद्यालयात कायदा आणि करिअरचे धडे

ब्रह्मपुरी/का.प्र.

विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता काळाची पावले ओळखून कायद्याचे भान ठेवावे आणि स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून आपले भविष्य उज्ज्वल करावे, या उद्देशाने महाराष्ट्र विद्यालय, पिंपळगाव भोसले येथे पोलीस स्टेशन ब्रह्मपुरीच्या वतीने विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ७ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमात पोलीस प्रशासनातर्फे कायदा, सुरक्षा आणि करिअर विषयावर मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून ब्रह्मपुरी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक रेवणसिद्ध कदम साहेब आणि पोलीस हवालदार अरुण पिसे उपस्थित होते. त्यांनी अतिशय ओघवत्या भाषेत विद्यार्थ्यांशी संवाद साधत विविध विषयांवर प्रकाश टाकला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी आणि रोजगाराच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत, याबद्दल कदम साहेबांनी मोलाच्या टिप्स दिल्या. देशात नव्याने लागू झालेल्या तीन कायद्यांची माहिती देऊन, 'लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण' (पॉक्सो) कायद्याबाबत विद्यार्थ्यांना सतर्क करण्यात आले. तरुण पिढीने अंमली पदार्थांच्या विळख्यातून कसे दूर राहावे, याचे गांभीर्य पटवून देण्यात आले. अपघातांचे प्रमाण टाळण्यासाठी वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले.

# ब्रम्हपुरीत संत नरहरी महाराज पुण्यतिथी उत्साहात संपन्न

ब्रह्मपुरी/का.प्र.

संत नरहरी सुवर्णकार समाज संस्था ब्रह्मपुरी तर्फे संत शिरोमणी नरहरी महाराजांची पुण्यतिथी मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात हेमंतकुमार मस्के, प्रिती पुष्पाकर बांगरे, माधुरीताई खापरे यांच्या शुभहस्ते ,मुर्ती पुजन व दिप प्रज्वलनाने व आरतीने करण्यात आले. प्रसंगी ब्रह्मपुरीमधून भजन दिंडी व रथासह भव्य शोभायात्रा काढण्यात आली. दुपारी हिरालालजी येलतुरे आणि संच यांचे भजन, ह.भ.प.वामनराव हाळगे महाराज विसोरा यांचे कीर्तन व गोपाल काला कार्यक्रम करण्यात आला. दुपारी २.००ते ५.०० वाजता महिलांसाठी, पुरुषांसाठी व मुलांसाठी विविध स्पर्धा, रेकार्डिंग डाँस घेण्यात आले. सायंकाळी डॉ.अक्षयजी अतुलजी नागरे नागपुर, डॉ. मयुरी शामजी ढोमणे, प्रा.डॉ. संजयराव हर्षे ब्रह्मपुरी, डॉ. अतुलजी येरपुडे तसेच पुष्पाकरजी बांगरे नगरसेवक या सर्वांचा सत्कार करण्यात आला. रात्री विविध स्पर्धेचे बक्षीस मान्यवरांच्या हस्ते वितरणाचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर महाप्रसाद वितरीत करण्यात आला.

# क्रिडा साहित्य वाटप व क्रिडांगण विकासाचे आश्वासन

## खेमराज तिडके यांचा चौगानच्या युवकांच्या विकासाचा संकल्प

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील चौगान गाव हे सैनिक, अग्निवीर, पोलीस सेवेत कार्यरत युवकांचे



तसेच उच्च शिक्षित तरुणांचे गाव म्हणून ओळखले जाते. आतापर्यंत चौगान येथील ४० युवकांची आर्मी व पोलीस सेवेत निवड झालेली आहे. येत्या काळात पोलीस भरती व विविध शासकीय भरती प्रक्रिया अपेक्षित असल्याने गावातील युवकांना मैदानी तयारी उत्तम प्रकारे करता यावी, कोणतीही अडचण भासू नये, या उद्देशाने तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके यांच्या वतीने चौगान येथील युवकांना क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले.

या वेळी बोलताना खेमराज तिडके यांनी मैदानावर उपस्थित युवकांना व भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आश्वासन दिले की, स्व. राजीव गांधी क्रीडांगण, चौगान (आबादी) येथे तात्पुरत्या स्वरूपात रनिंग ट्रॅक उभारण्यात येणार आहे. त्यामुळे भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सरावासाठी मोठा फायदा होणार आहे. त्यांनी पुढील वर्षाबाबत दीर्घकालीन नियोजनाची माहिती देताना सांगितले की, स्व. राजीव गांधी क्रीडांगणाची जागा वनविभागाच्या अखत्यारित असल्यामुळे ३/२ चा ठराव करून जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याच्या शिफारशीने निधी प्राप्त केला जाईल. त्या माध्यमातून पुढील वर्षी कायमस्वरूपीचा पक्का रनिंग ट्रॅकसह संपूर्ण ग्राउंडचा सर्वांगीण विकास करण्यात येईल, असे ठाम आश्वासन दिले.

क्रीडा साहित्य वाटपाच्या वेळी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, सेवा सहकारी सोसायटीचे संचालक श्रीहरी देवगडे, पत्रकार संतोष पिलारे, सचिन राऊत, सुरज देव्हारी, विशाल तुपट, रुपेश बुराडे, साहिल मैद यांच्यासह मैदानावर सुमारे ३० ते ३५ युवक उपस्थित होते.

**... QUOTES ...**

**"Keep your face always toward the sunshine and shadows will fall behind you."**

**- Walt Whiteman**

**चारोळी**

*पाणी कितीही उकळलं उकळलं*
*आटून जाईल तरी येणार नाही साय...*
*बजेट कितीही मांडा-मांडा संसदेत,*
*आत्महत्या शेतकऱ्यांच्या थांबणार नाय...*

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★










# बोढेगावात 'छळ' नाटकाला उत्स्फुर्त प्रतिसाद

## संत श्री गजानन महाराज प्रकटदिन उत्साहात साजरा



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील बोढेगांव येथे श्री संत गजानन महाराज प्रकट दिनाचे औचित्य साधून श्री संत गजानन महाराज मंदिर व्यवस्थापन समितीच्या वतीने 'छळ' या तीन अंकी नाटकाचे दिमाखदार आयोजन करण्यात आले. या नाट्यप्रयोगाला परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी करत अभिनयाचा मनमुराद आनंद लुटला.

या नाट्यप्रयोगाचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद चिमूरकर यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दामोधरजी सिंगाडे होते. तर सत्कारमूर्ती म्हणून राऊत सर (ज्ञानेश्वरी पावन विद्यालय, बेटाळा) उपस्थित होते. कार्यक्रमाचे रंगमंच पूजन गजानन सेलोटे, सुनील धांडे माजी सरपंच पिंपळगाव,सुभाष नाकतोडे, हेमंत बुल्ले, नंदकिशोर खापरे (विस्तार अधिकारी, ब्रह्मपुरी), मंगेश नन्नवरे (सरपंच, बोढेगांव), विक्की लांडगे आणि ईश्वर मेश्राम यांच्या हस्ते संपन्न झाले.या सोहळयाला उपाध्यक्ष म्हणून प्रेमलाल धोटे, मोरेश्वर दर्वे आणि संजीव मिसार उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून विनोद राऊत, चरणदास गडे, राजू दिघोरे, सचिन राऊत, मोरेश्वर नन्नावरे, रामलाल ढोरे, उत्तम बगमारे, रमेश नन्नावरे , सुधीर नन्नवरे, धर्माजी नन्नवरे, गणेश नाकतोडे, गजानन ढोरे, मधु बुल्ले, बंडू बुल्ले, प्रभाकर बुल्ले, शांताराम चौके, राजकुमार शेंडे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता**
**www.bramhapuri samachar.com/bs**
**या ऑनलाईन साईटला भेट द्या**

# स्व. अशोकजी सिंहल स्मृती...

(पान क्र. ९ वरून)

विवीध विषयावर व्याखान आयोजीत केले आहेत.

दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोज बुधवारला सांयंकाळी ६.०० वाजता व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प 'एकात्म मानव दर्शन' नितीनजी खर्च, अध्यक्ष यवतमाळ अर्बन बँक यवतमाळ हे गुंफणार आहेत. या प्रसंगी प्रमुख अतिथी योगेशजी मिसार नगराध्यक्ष न. प. ब्रम्हपुरी यांची उपस्थिती राहणार आहे. दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोज गुरुवारला द्वितीय पुष्प 'राष्ट्रसाधनेची शंभर वर्षे (संघ शताब्धी), श्रीधरराव गाडगे हे गुंफणार असुन या प्रसंगी प्रमुख अतिथी भगवानजी पालकर, सेवानिवृत्ती अधिकारी ब्रम्हपुरी यांची उपस्थिती असणार आहे.तसेच तृतीय पुष्प दि.१३ फेब्रुवारी २०२६ रोज शुक्रवारला 'नैतिक मूल्य शिक्षण व संस्काराचे महत्त्व' गोविदजी शेंडे, केंद्रीय सहमंत्री, नैतिक शिक्षण मुल्य आयाम विश्व हिंदू परिषद नागपूर हे गुंफणार असुन या पुष्पाला प्रमुख अतिथी सुशिलजी हिंगे सामाजीक कार्यकर्ते गडचीरोली हे राहणार आहेत.

सदर व्याख्यानमालेचे लाभ घेण्याचे आवाहन व्याखानमाला आयोजन समाती, एकात्मता शिक्षण संस्था ब्रम्हपुरी तसेच हिंदू ज्ञान मंदीर ब्रम्हपुरी यांनी केले आहे.

# ब्रम्हपुरीच्या ऐतिहासिक टेनिस क्लबचा ९० वा वर्धापन दिन

ब्रह्मपुरी/का.प्र.

विदर्भातील एक ऐतिहासिक वारसा असलेल्या आणि चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रिटिशकालीन वास्तू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्रह्मपुरी टेनिस क्लबने आपल्या अस्तित्वाची नऊ दशके पूर्ण केली आहेत. ३१ जानेवारी २०२६ रोजी या गौरवशाली ९० व्या वर्षपूर्तीचा सोहळा क्लबच्या प्रांगणात अत्यंत थाटात संपन्न झाला.

क्लबच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या ज्येष्ठ सदस्यांचा (प्रा. सुभाष बजाज, प्रा. मिश्रा सर, डॉ. नागरे, नारायणराव ठेंगरी, बाळकृष्ण ठेंगरी, श्रीराम धोटे, श्रीराम दोनाडकर, श्री. धकाते) शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. सत्कारमूर्तींनी आपल्या मनोगतातून क्लबच्या जुन्या स्मृतींना उजाळा दिला. इमारतीवर आकर्षक रोषणाई, फटाक्यांची आतिषबाजी आणि केक कापून वास्तूचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्लबचे अध्यक्ष डॉ. सतीश कावळे होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार प्रा. अतुल देशकर, प्रा. राजेश कांबळे आणि सचिव नामदेवराव लांजेवार उपस्थित होते.




Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404